# दिवा महोत्सवची उत्साहात सुरुवात


# दिवा न्यूज


दिशादर्शक, मार्गदर्शक!

www.diwanews.com






▶ वर्ष–२ ■ अंक–२१ ■ epaper.diwanews.com ■ सोमवार, २६ डिसेंबर २०२२ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


## भाजप आणि शिंदे गट दोघेही सत्तेत आहेत
## दिवा डम्पींग कायमचे बंद करण्यासाठी यापेक्षा योग्य मुहूर्त कोणता असेल?

दिवा न्यूज विशेष

राज्यात भाजप आणि बाळासाहेबांची शिवसेना हे दोन्ही पक्ष सत्तेत आहेत.महापालिकेत सध्या आयुक्त प्रशासक म्हणून काम पाहत आहेत.राज्याचे कारभारी असणारे भाजप आणि बाळासाहेबांची शिवसेना या दोघांचीही दिवा डम्पिंग ग्राउंड बंद व्हावे अशी मागणी आहे,भावना आहे.दोघे सत्तेत असूनही डम्पिंग बंद करू शकत नाहीत अशी एकंदरीत स्थिती असताना, हे डम्पिंग बंद करणार कोण? हा गंभीर प्रश्न आहे. (पान ३ वर)

# ठाणे वनविभागाच्या धडक कारवाई

## ५ पोपट, दुर्मिळ १६ स्टार ब्लॅक कासवांची सुटका,तिघांना अटक

**ठाणे :** दुर्मिळ वन्य प्राण्यांची बेकायदेशीर विक्री करणाऱ्या मुंबईतील प्रमोद शिवसुरत पाल तसेच शकील खान आणि दीपक म्हात्रे या तिघांना वेगवेगळ्या ठिकाणाहून ठाणे वन विभागाने अटक केली. तसेच त्यांच्याकडून पाच पोपट आणि १६ दुर्मिळ कासव जप्त केले आहेत. ही कारवाई मालाड आणि क्रॉफेट मार्केट येथे केली असून त्या तिघांना बुधवारी न्यायालयात हजर केले आहे. हे दुर्मिळ वन्यजीव पाळल्यावर घरात धनसंपत्ती येते, हा गैरसमज आहे. तसेच असे दुर्मिळ वन्य जीव पाळणाऱ्या किंवा बेकायदेशीररित्या विक्री करणाऱ्यांवर वन्य जीव अधिनियम १९७२ नुसार कारवाई करण्यात येईल असे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहे.

वनविभाग आणि वर्ल्डवाईड क्राईम कंट्रोल ब्युरो, मानद वन्यजीव रक्षक रोहित मोहिते यांनी संयुक्त कारवाईत २० डिसेंबर, २०२२ रोजी तिघांना मालाड आणि क्रॉफेट मार्केट या दोन ठिकाणी केलेल्या कारवाईत अटक केली. मालाड पूर्व येथे छापेमारी प्रमोद पाल याला अटक करून एक पोपट आणि ७ दुर्मिळ ब्लॅक स्टार कासव हस्तगत केले. तर क्रॉफेट मार्केट मधील प्राणी विक्री करणाऱ्या शकील खान आणि दीपक म्हात्रे यांना अटक केली. त्यांच्याकडून ४ पोपट आणि ९ ब्लॅक स्टार कासव हस्तगत केले. ही कारवाई ठाणे उपवनसंरक्षक संतोष सस्ते, साहाय्यक वनरक्षक गिरीजा देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली वनक्षेत्नपाल राकेश भोईर यांच्या पथकाने केली.

# जिद्द, चिकाटी आणि प्रचंड मेहनत घेऊन यशाचे शिखर सैर करा -क्रिकेटपटू प्रवीण तांबे

*__ठाणे:__ जिद्द, चिकाटी, प्रचंड मेहनत आणि टीमवर्क करुन यशाचे शिखर खेळाडूंनी गाठावे. संघाच्या यशाबरोबर तुमचाही नावलौकीक वाढेल, असे मार्गदर्शन क्रिकेटपटू प्रवीण तांबे यांनी केले. घोडबंदर रोडवरील पातलीपाडा येथील श्री माँ विद्यालयाच्या विद्यार्थ्यांसमवेत प्रवीण तांबे बोलत होते.*

*श्री माँ गुरुकुल शाळेचा वार्षिक क्रीडा महोत्सव शाळेच्या मैदानात संपन्न होत आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बुधवार प्रवीण तांबे उपस्थित होते. यावेळी व्यासपिठावर प्रिन्सीपॉल चित्रा अय्यर (श्री माँ विद्यालय), प्रिन्सीपॉल सेजल नारंग (श्री माँ बालनिकेतन), संस्थेचे सचिव जोशी सर आदी मान्यवर उपस्थित होते.*

*प्रवीण तांबे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना आपल्या खडतर क्रीडा क्षेत्राचा प्रवास कसा सुकर करावा याचे मार्गदर्शन केले. ते म्हणाले, श्री माँ विद्यालयाचे आपल्याला प्रशस्त मैदान लाभले आहे. शाळेचे संचालक मंडळ, प्रिन्सीपॉल, शिक्षक हे क्रीडा क्षेत्राला पोषक वातारण निर्माण करत आहेत. याचा पुरेपूर लाभ तुम्ही घ्या.*




*आजवरची शाळेची क्रीडा क्षेत्रातील कामगिरी अतिशय उल्लेखनीय आहे. खेळ म्हटले की हारणे किंवा जिंकणे आलेच. पण हरलो म्हणून निराश होऊ नका पराभव पचवून पुढे जात रहा असा मोलाचा सल्लाही त्यांनी दिला. खेळाला वयाचे बंधन नसते. वाढते वयाचे काऊंटींग न करता स्वप्न पहात रहा, एक दिवस तुम्ही नक्कीच यशस्वी खेळाडू व्हाल, असेही ते म्हणाले. यावेळी उपस्थित क्रिकेटचे प्रशिक्षण घेणाऱ्या मुला-मुलींना मोलाच्या टीप्स दिल्या.*

*यावेळी वार्षिक क्रीडा महोत्सवात विजयी झालेल्या खेळाडूंचा प्रवीण तांबे यांच्या हस्ते पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला*

**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफीस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.

# नराधमास एक वर्षाची शिक्षा

## नवीमुंबई-कोपरखैरणे येथील घटना

**ठाणे:** चॉकलेटचे आमिष दाखवत सात वर्षीय मुलीचे अपहरण करत तिच्यावर अत्याचार करणाऱ्या कादीर शहाबत अली शेख (२०) याला ठाणे जिल्हा व सत्र न्यायालयाचे न्यायाधीश व्ही व्ही वीरकर यांनी बुधवारी दोषी ठरवत १ वर्ष कारावास आणि एक हजार रुपये दंड अशी शिक्षा ठोठावली. ही घटना कोपरखैरणे पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३० सप्टेंबर २०१६ मध्ये घडली होती. सरकारी वकील म्हणून रेखा हिवराळे यांनी काम पाहिले.

आरोपी हा बेरोजगार असून त्याने पिडीत मुलगी खेळत असताना, तिला चॉकलेटचे आमिष दाखवत खाडी किनारी नेत, तिच्या मनास लज्जा उत्पन होईल असे कृत्य करताना तेथून ये-जा करणाऱ्या नागरिकांनी त्याला पकडले. तसेच त्याला चोप देत पोलिसांच्या हवाली केले. गुन्हा दाखल झाल्यानंतर त्याला अटक केली. याप्रकरणी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर हा खटला न्यायाधीश वीरकर यांच्यासमोर आला. यावेळी सरकारी वकील हिवराळे यांनी सादर केलेले पुरावे आणि सात साक्षीदारांची साक्ष ग्राह्य मानून त्याला दोषी ठरवले. तसेच एक कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच एक हजार रुपये दंड न भरल्यास १० दिवस कैदेची शिक्षा भोगावी लागणार आहे असे आदेश दिले आहेत.

# नाताळ निमित्त उपवन येथे पहिल्यांदाच वंडरलँड फेस्टिवलचे आयोजन

**ठाणे :** संस्कृती युवा प्रतिष्ठान व प्रताप सरनाईक फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे शहरातील नागरिकांसाठी नाताळ निमित्त २३ डिसेंबर, २०२२ ते १ जानेवारी, २०२३ पर्यंत उपवन येथे वंडरलँड फेस्टिवलचे आयोजन करण्यात येणार आहे. त्यानिमित्त उपवन जेट्टी येथे ख्रिसमस ट्री उभारण्यात येणार असून आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात येणार आहे. जेणेकरून उपवन तलाव जेट्टीच्या परिसराला एक वेगळीच झळाली मिळणार आहे. ठाणे शहराची ओळख तलावांचे शहर अशी असताना आता आमदार प्रताप सरनाईक व युवासेनेचे सचिव पुर्वेश सरनाईक यांच्या माध्यमातून आयोजित केलेल्या विविध सांस्कृतिक कला क्रीडा महोत्सवामुळे ठाणे शहर आता सांस्कृतिक शहर म्हणून ही ओळखले जाऊ लागले आहे. सर्व जाती-धर्माचे उत्सव मोठ्या आनंदात साजरे करण्यासाठी नाताळ सणामध्ये ठाणेकरांना सहभागी व्हावे यासाठी हा अनोखा प्रयत्न पुर्वेश सरनाईक यांच्या माध्यमातून करण्यात आलेला आहे.

लोकमान्यनगर-शास्त्रीनगर विभाग व आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांसाठी 'संस्कृती कला-क्रीडा महोत्सवाचे देखील आयोजन २४ ते २७ डिसेंबर, २०२२ पर्यंत करण्यात येणार आहे. संस्कृती कला-क्रीडा महोत्सवाचे हे चौथे वर्ष असून यामध्ये बुध्दिबळ, कॅरम, क्रिकेट, स्विमिंग, चित्रकला, रांगोळी, पाककला, गायन, नृत्य, फॅन्सी ड्रेस, मिस व मिसेस लोकमान्यनगर व होम-मिनिस्टर या विविध स्पर्धा घेण्यात येणार आहेत. या स्पर्धांमध्ये लहान मुलांपासून, महिला, पुरूष ते जेष्ठ नागरिकांपर्यंत सर्वच वयोगटातील स्पर्धक सहभागी होत असतात. दरवर्षी अंदाजे अडीच ते तीन हजार स्पर्धक सहभागी होत असतात. स्थानिकांच्या कला-गुणांना वाव मिळावा व आपली कला जोपासावी या मुळ उद्देशाने सरनाईक यांनी या कला-क्रीडा महोत्सवास सुरुवात केली होती. महोत्सवात दरवर्षी सहभागी होणार्या स्पर्धकांची वाढती संख्या लक्षात घेता हा महोत्सव नागरिकांच्या जिव्हाळ्याचा विषय बनला असल्याचे लक्षात येते.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**

Printed, Published and Owned by Suhas Shantaram Khandagale and Printed at Siddhhakala Print Media & Publication Pvt. Ltd. Plot No. W--230, TTC Industrial Area, Khairane, Navi Mumbai-400710. Dist. Thane, Maharashtra and Published at Shri Krupa Building, A-Wing, First Flr., Flat No. 101, Near Sent Marry School, Diva (E), Thane-400612 Taluka/Dist. Thane, State-Maharashtra. **Editor : Suhas Shantaram Khandagale, RNI No.-MAHMAR/2021/80669**

# भाजप आणि शिंदे गट दोघेही सत्तेत आहेत दिवा डम्पींग कायमचे बंद करण्यासाठी यापेक्षा योग्य मुहूर्त कोणता असेल?

**दिवा न्यूज विशेष**

(पान १ वरून)

मागील अनेक वर्षांपासून राजकिय पक्षांपेक्षा दिव्यातील सामान्य नागरिक डम्पिंग ग्राउंड बंद करण्याची मागणी करत आहेत. या मागणीला राजकीय पक्ष यांनी वेळोवेळी पाठिंबा दिला आहे.राजकीय पक्षांची तशी आंदोलने झाली आहेत. प्रत्यक्षात दिवा डम्पिंग ग्राउंड बंद होण्याची आश्वासनच नेहमी दिव्यातील आंदोलन करणाऱ्यांना मिळालेली आहेत. दिवा शहरात असणारे हे डम्पिंग ग्राउंड येथील लहान मुलांना दम्याचे व श्वसनाचे आजार होण्यास कारणीभूत ठरलेले आहे. डम्पिंग ग्राउंड मधून निघणारे धुराचे लोळ हे येथील नागरिकांच्या आरोग्यास घातक ठरत आहेत.मागे काही वर्षांपूर्वी विषारी वायू गळती याच डम्पिंग ग्राउंड वर झाल्याने दिव्यातील नागरिकांना त्रास झाला होता.



शहराच्या इतक्या जवळ असणारे हे डम्पिंग बंद करण्याचे आश्वासन पालिकेत सत्ताधारी असणाऱ्या तेव्हाची शिवसेना आणि आताची बाळासाहेबांची शिवसेना यांनी दिव्यातील जनतेला दिले होते. डम्पिंग ज्यावेळी सुरू झाले त्यावेळी महापालिकेत भारतीय जनता पार्टी सुद्धा तत्कालीन शिवसेनेबरोबर सत्तेत होती. आज ठाण्यातील भाजपचे नेते दिव्यात येऊन डम्पिंग ग्राउंड बंद करण्यासाठीचे आंदोलन करतात हे आश्चर्य आहे.ठाण्यातील भाजपचे नेते दिवा डम्पिंग ग्राउंड बंद झाले पाहिजे यासाठी रस्त्यावर उतरतात ही मोठी गंमत आहे.शिवसेना फक्त निवडणूक जवळ आल्यावर डम्पिंग बंद करण्याची घोषणा करते हा दिव्यातील जनतेला गृहीत धरण्याचा प्रकार आहे.

ठाण्यासारख्या महानगराला स्वतंत्र शास्त्रीय दृष्टिकोनातून कचऱ्याची विल्हेवाट लावणारे सक्षम डम्पिंग ग्राउंड उभारण्यात मागील अनेक वर्षांपासून ठाण्यातील सर्वच पक्षाचे नेते अपयशी ठरले याकडे हे नेते दुर्लक्ष करतात. दिव्यातील सत्ताधारी पक्षाचे नगरसेवक यांची देखील दिवा डंपिंग ग्राउंड बंद व्हावी अशी भूमिका वेळोवेळी दिसून येते. त्यांचे ठाण्यातील नेते दिव्याचे डम्पिंग ग्राउंड बंद केले पाहिजे असे म्हणतात. डम्पिंग ग्राउंड बंद करण्यासाठी आम्ही पुढाकार घेऊ असे दिवेकरांना निवडणूक मध्ये आश्वासन देतात. विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिव्यात डम्पिंग ग्राउंड बंद करण्याची घोषणा देखील केली होती. विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही दिव्यातील डम्पिंग ग्राउंड बंद करण्यासाठी भाजपला सत्ता द्या असं आव्हान केलं होत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस दोघांचे चांगले राजकीय संबंध आहेत.

शिवाय दोघांचे राजकीय पक्ष हे सत्तेत आहेत. दिवा डम्पिंग ग्राउंड बंद करण्यासाठी याच्यापेक्षा मोठा योग असू शकत नाही. त्यामुळे दिव्यातील जनतेची राजकीय फसवणूक करण्यापेक्षा दिवा शहरातील भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी आणि दिवा शहरातील बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे पदाधिकारी यांनी एकत्रित रित्या मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांची भेट घेऊन दिव्यातील डम्पिंग बंद केलं पाहिजे.

ठाण्यातील भाजपचे नेते आणि बाळासाहेबांच्या शिवसेनेचे नेते यांनी या मागणीला पाठिंबा देत तातडीने दिवा बंद करण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. जनतेच्या हितासाठी ठाणे भाजप,दिवा भाजप आणि ठाणे बाळासाहेबांची शिवसेना व दिव्यातील बाळासाहेबांची शिवसेना यासाठी पुढाकार घेणार का? हाच दिव्यातील सर्वसामान्य नागरिकांना पडलेला प्रश्न आहे.मागील १५ वर्षे दिव्यातील डम्पिंग ग्राउंड बंद करू या आश्वासन वर निवडणूक लढल्या आणि जिंकल्या जात असतील तर महापालिका म्हणून ज्या नागरी सुविधा येथील नागरिकांना मिळायला हव्यात त्या मिळणार कधी? हा आमचा सवाल आहे!

## समर्थ नगरचा रस्ता जलदगतीने पूर्ण करा

### मनसेची मागणी




**दिवा:–**दिव्यातील समर्थ नगर ते के.जे.कॉम्प्लेक्स पर्यंतच्या नवीन रस्त्याचे काम अतिशय संथ गतीने सुरू असून, गेल्या महिन्याभरापासून रस्त्याच्या कामासाठी हा रस्ता खोदून ठेवल्यामुळे शाळकरी मुले, महिला आणि इतर सर्वसामान्य नागरिकांना याचा त्रास सहन करावा लागतोय. एखाद्या इमारतीत आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास अग्निशामक आणि रुग्णवाहिका इमारतीपर्यंत पोहचण्यास अडचण निर्माण होऊ शकते. त्यामुळे संबंधित ठेकेदाराला तात्काळ या रस्त्याचे काम जलदगतीने पूर्ण करण्याचे आदेश महानगरपालिकेने द्यावेत यासाठी दिवा मनसेच्या वतीने दिवा प्रभाग समिती सहाय्यक आयुक्तांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

## कोकण प्रतिष्ठानच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन,मान्यवरांची उपस्थिती

**दिवा:–**कोकण प्रतिष्ठान संघटनेचा वर्धापन दिन उत्साहात दिवा येथे साजरा झाला दिवा शहरात कार्यरत असणाऱ्या कोकण प्रतिष्ठान संघामार्फत विविध सामाजिक उपक्रम राबवले जात असतात. संघटनेच्यावतीने संघटनेचे पदाधिकारी दिव्यातील कोकणातील नागरिकांसाठी लोकोपयोगी उपक्रम राबवत असतात अशी माहिती संघटनेचे पदाधिकारी प्रशांत गावडे यांनी दिली.







कोकण प्रतिष्ठान संघटनेचा आठवा वर्धापन दिन नुकताच दिवा येथे पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी संघटनेची दिनदर्शिका प्रकाशित करण्यात आली.या कार्यक्रमाला दिवा शहरातील विविध पक्ष संघटनेच्या मान्यवरांनी उपस्थिती लावली.

# सावरकर नगर परिसरातील नागरिक पितात 'अस्वच्छ' पाणी



**ठाणे :** सावरकर नगर येथील महापालिकेच्या जलकुंभला भगदाड पडल्यानंतर तातडीने दुरुस्ती केली जाईल असे आश्वासन पालिका प्रशासनाने दिले. मात्र अद्यापही दुरुस्ती झालेली नाही. त्यामुळे त्या जलकुंभात चक्क माकडे अंघोळ करत असल्याची बाब पुढे आली आहे. तेच अस्वच्छ पाणी पिण्याची वेळ सावरकर नगर आणि लोकमान्य नगर या परिसरातील नागरिकांवर ओढवली आहे. त्यातच मागील आठ महिन्यांपासून नादुरुस्त असलेले ते जलकुंभ धोकादायक झाले आहे. त्याची तातडीने दुरुस्ती करावी अन्यथा ते पडल्यास मोठी हानी होण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. अशी भीती स्थानिकांनी व्यक्त केली.

मागील ५ एप्रिल २०२२ रोजी सावकरनगर भागातील जलकुंभाला (पाण्याच्या टाकीला) भगदाड पडले होते. ते भगदाड तत्काळ दुरुस्त केले जाईल असे आश्वासन महापालिकेने केले होते. मात्र अद्यापही ते दुरुस्त न झाल्याचेच दिसत आहे. त्यातून महापालिकेचा नियोजनशुन्य कारभार दिसून येत असल्याचा आरोप येथील स्थानिक राजीव शिरोडकर यांनी केला आहे. केवळ नवीन जलवाहीनी टाकण्याचे आणि पाणी टाकी दुरुस्त करण्याचे केवळ आश्वासन दिले जात आहे.

मात्र मागील आठ महिन्यापासून हे जलकुंभ उघडी असल्याने त्यात मच्छर व इतर किड किटके जाऊ लागल्याचे चित्र दिसत आहे. त्यातही त्या आता पाईपलाईन मधून माकडे सुध्दा वर जाऊन अंघोळ करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

पालिका अधिकारी आणि ठेकेदारा यांच्या केवळ बैठका होत आहेत, मात्र टाकीची दुरुस्ती कधी होणार याची माहिती अद्यापही दिली जात नाही. त्यात ही टाकी धोकादायक झाली असल्याने ती तत्काळ दुरुस्त होणे अपेक्षित आहे. अन्यथा मोठी हानी होण्याची शक्यताही नाकारता येत नसल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. पालिका याकडे लक्ष देईल का? असा सवाल आता स्थानिक नागरिकांनी उपस्थित केला जात आहे.

# उल्हासनगरसाठी नव्या भुयारी गटार योजनेला मंजुरी

**उल्हासनगर:** उल्हासनगर महापालिका क्षेत्रातील सुमारे ४० ते ५० वर्ष जुन्या मलनिसारण व्यवस्थेला बळकटी मिळणार आहे. अमृत टप्पा दोनमध्ये शहरासाठी नव्या भुयारी गटार योजनेला मंजुरी देण्यात आली आहे. ४१६ कोटी ६६ लाखांच्या कामाला मंजुरी देण्यात आली असून यात जुनी व्यवस्था बदलून अद्ययावत केली जाणार आहे. तसेच सांडपाणी वाहिन्या, चेंबर आणि सांडपाणी प्रक्रिया केंद्राची यात उभारणी केली जाणार आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे नुकत्याच झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत या योजनेला मंजुरी देण्यात आली.

**४१६ कोटीच्या खर्चातून उभारणी जाणार नवी व्यवस्था**

उल्हासनगर शहरात लोकसंख्येची घनता मोठी आहे. त्यामुळे शहरातील पायाभूत सोयीसुविधांवर ताण येत असतो. सध्या शहरात अद्ययावत सुविधा देण्याचा येथील खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचा प्रयत्न आहे. यात प्रयत्नातून अनेक योजनांना मंजुरी मिळवण्यात आली आहे. तर त्याचवेळी शहरातील जुन्या सुविधा अद्ययावत करण्याचेही काम खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून केले जाते आहे. याच कामात आता शहरासाठी नवी भुयारी गटार योजना मंजुर करण्यात आली आहे. नुकत्याच झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत उल्हासनगर महापालिकेसाठी ४१६ कोटी ६६ लाखांच्या भुयारी गटार योजनेला मंजुरी देण्यात आली आहे. यात मलवाहिन्या टाकणे, मलशुद्धीकरण केंद्र उभारणे, मालमत्तांना नव्या जोडण्या देणे, मलवाहिन्या टाकण्यासाठी रेल्वे रूळ ओलांडण्यापोटी पैसे अदा करणे अशा कामांचा यात समावेश आहे.

# नवीन वर्षात ठाणेकरांच्या सेवेसाठी दाखल होणार इलेक्ट्रिक आणि सीएनजी बसेस

**ठाणे :** नवीन वर्षात ठाणे परिवहन सेवेच्या ताफ्यात नवीन इलेक्ट्रिक आणि सीएनजी बसेस दाखल होणार आहे. याबसेसचे वेगळेपण आधोरेखित करण्यात येणार आहे. त्यानुसार इलेक्ट्रिक बसेसला मध्ये हिरवा रंगाचा आणि सीएनजी बसेसला हिरवा-पिवळा रंगाचा पट्टा असणार आहे. या संदर्भात नुकत्याच बुधवारी पार पडलेल्या ठाणे परिवहन समितीच्या बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.

ठाणे परिवहन सेवेच्या तब्बल १५३ बसेस या मागील कित्येक वर्षांपासून कळवा आणि वागळे आगारात पडून होत्या. कायद्यानुसार ज्या बसेस दहा वर्ष जुन्या असतील किंवा त्या सहा लाख किंवा त्यापेक्षा अधिक धावल्या असतील. अशा बसेस या भंगारात विक्रीसाठी काढल्या जातात. अशा प्रकारे नादुरुस्त आणि मुदत संपलेल्या बसेस आगारात उभ्या होत्या. या नादुरुस्त भंगारातील बसेसच्या लिलावाची ऑनलाईन प्रक्रिया पार पडली. या लिलाव प्रक्रियेत दिल्ली, मुंबई, हैद्राबाद, बंगळूरू आदी शहरातील भंगार विक्रेत्यांनी सहभाग घेतला. या प्रक्रियेतून पाच कोटी ८२ लाख इतकी रक्कम ठाणे परिवहन सेवेला प्राप्त झाली होती. आता या रक्कमेतून ठाणे परिवहन सेवेने २० सीएनजी बसेस विकत निश्चित केले असून केंद्र सरकारच्या अनुदानातून नवीन इलेक्ट्रिक बसेसही नवीन वर्षात परिवहन ताफ्यात दाखल होणार आहे. या बसेसचे वेगळेपण असावे, याकरिता ठाणे परिवहन समिती प्रयत्नशील होती. या बैठकीत सदस्यांची चर्चा झाली. चर्चे अंती या बसेसचा रंग हा लालच असेल पण दोघांमध्ये फरक असावे, याकरिता इलेक्ट्रिक बसेसला मधोमध हिरव्या रंगाचा पट्टा तर सीएनजी बसेसच्या मध्ये हिरवा आणि पिवळा रंगाचा पट्टा ठेवण्याचे निश्चित करण्यात आले. त्याला परिवहन समिती सदस्यांनी मान्यता दिली आहे.

***नवीन येणाऱ्या इलेक्ट्रिक आणि सीएनजी बसेसच्या वेगळेपणाबाबत बुधवारच्या बैठकीत चर्चा झाली. यात प्रत्येक सदस्याने आपले मत मांडले. अखेर इलेक्ट्रिक बसेसच्या मधोमध हिरवा तर सीएनजी बसेसच्या मध्ये पिवळा हिरवा रंगाचा पट्टा असेल यावर सर्वांचे एकमत झाले आहे.***

***– विलास जोशी, सभापती, ठाणे परिवहन सेवा समिती.***

# ज्यूदो स्पर्धेत ठाण्याला सात पदके



**ठाणे:** नवीमुंबई, ऐरोली तखइत्रश्चजठ हायस्कूल येथे नुकत्याच पार पडलेल्या विवो ज्यूदो स्पर्धेत ठाण्याच्या सरस्वती क्रीडा संकुलातील खेळाडूंनी दोन सुवर्णपदकांसह सात पदके जिंकली आहेत. जान्हवी कुलकर्णी, हर्ष पिसाळ या दोघांनी सुवर्णपदक तर श्लोक सरोदे, रुद्र शेलवले यांनी रौप्यपदक जिंकले. तसेच प्रांशु पायगुडे, अथर्व मुकादम आणि गोपाळ पणशीकर या तिघांना कांस्यपदकांवर समाधान मानावे लागले आहे. हे खेळाडू सरस्वती क्रीडा संकुलात प्रशिक्षक देवीसिंग राजपूत व सह प्रशिक्षक साहिल मेंडन यांच्या मार्गदर्शनाखाली ज्युदोचा सराव करतात.

# भारतीय सैन्य दलातील लेफ्टनंट स्वराज बनेंचा सत्कार



**ठाणे :** शौर्य डिफेन्स अकॅडमी ठाणे आणि महाराष्ट्र युवा क्रिडा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय सैन्य दलात लेफ्टनंट पदी निवड झालेल्या स्वराज बने यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला आमदार संजय केळकर, मेजर प्रांजळ जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

# आदिती करणार जिल्ह्याचे प्रतिनिधित्व




**ठाणे:** परभणी येथे २५ डिसेंबर रोजी होणाऱ्या महाराष्ट्र राज्य क्रॉस कंट्री चॅम्पियनशिप '२२' मध्ये ठाणे जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी तिची निवड झाली आहे. १७ डिसेंबर २०१२ रोजी पार पडलेल्या ठाणे जिल्हा क्रॉस कंट्री चॅम्पियनशिप '२२' या स्पर्धेत आदिती पाटील हिने महिला गटात द्वितीय क्रमांक पटकावला. ती ठाणे महापालिका प्रशिक्षण योजनेअंतर्गत ठाण्याच्या दादोजी कोंडदेव स्टेडियम येथे प्रशिक्षक निलेश पाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते.

# दिवा महोत्सवाची उत्साहात सुरुवात




**दिवा:- बाळासाहेबांची शिवसेना व धर्मवीर मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दिवा महोत्सवची सुरुवात धूमधडाक्यात रविवारी सायंकाळी झाली.३० डिसेंबर पर्यंत दिवा महोत्सव दिव्यातील नागरिकांसाठी खुला असणार असून या ठिकाणी मनोरंजनाची मेजवानी आयोजकांनी रसिकांसाठी उपलब्ध करून दिली आहे. दिवा महोत्सव ला दिव्यातील नागरिक दरवर्षी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद देतात यावर्षीही नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभेल असे महोत्सवाचे संयोजक रमाकांत मडवी यांनी सांगितले.**



२५ डिसेंबर ते ३० डिसेंबर दरम्यान दिवा-शिळ रोड येथे करण्यात आले आहे. या महोत्सवाचे यंदा १४ वे वर्ष असुन दिव्यातील विविध कार्यक्रम, भजने, नृत्य अविष्कार, ऑर्केस्ट्रा, खाद्यसंस्कृती व पुरस्कार तसेच समाजातील संस्कृती, वैशिष्टपूर्ण परंपरा, आणि क्रीडा, कला, शैक्षणिक, सांस्कृतिक उपक्रमांच्या बहारदार कार्यक्रमांची मेजवानी असणार आहे.त्याचबरोबर युवा किर्तनकार ह.भ.प.कु.वैष्णवी महाराज,दातिवली गाव यांच्या सुश्राव्य किर्तनाचा लाभ भाविकांना घेता येणार आहे.

दिवा-शिळ रोडवर होणाऱ्या या आगळ्यावेगळ्या महोत्सवाला राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, ठाण्याचे पालकमंत्री शंभुराज देसाई, खासदार श्रीकांत शिंदे यांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच ठाणे मनपाचे माजी महापौर नरेश म्हस्के, आमदार रविंद्र फाटक, ठाणे शहरप्रमुख रमेश वैती, माजी महापौर मिनाक्षी शिंदे, विधानसभा संघटक ब्रम्हा पाटील, कल्याण जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे, आमदार प्रताप सरनाईक, स्थायी समिती सभापती राम रेपाळे, माजी महापौर अशोक वैती, माजी नगरसेवक राजन किणे, उद्योजक अनंत पाटील आदीसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

दिवा विभागाच्या सर्वांगीण विकासासाठी झटणाऱ्या परिसरातील समाजाच्या संस्कृतीचे जतन करणे, संवर्धन करणे या उद्देशाने सहा दिवस दिवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवामध्ये समाजातील संस्कृतीचे, प्रगतीशील वाटचालीचे तसेच वैशिष्टपुर्ण परंपरा व आगळेवेगळे चित्र साकारले जाणार असुन दररोज समाजातील बंधु-भगिनींच्या कलाविष्काराने नटलेल्या बहारदार कार्यक्रमासह कला, क्रिडा, शैक्षणिक, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच भजनांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. महोत्सवात एकुण ३३ भाग्यवंत महिलांना पैठणी प्रदान करण्यात येणार असुन विभागातील गुणवंतांना दिवा भूषण, दिवा गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.या महोत्सवात सुकी मासळी बाजार, पारंपारिक खाद्य स्टॉल, आकाश पाळणे, विविध खेळणी व इतर मनोरंजक बाबी तसेच आकर्षक खरेदीची संधी असून महोत्सवात सामील होणाऱ्या १ ते १० वयोगटातील बालकांचा वाढदिवस असल्यास तो साजरा करण्यात येणार आहे.

दिवा महोत्सव यशस्वी करण्यासाठी महोत्सव समितीचे संयोजक ठाण्याचे माजी उपमहापौर रमाकांत मढवी, उमेश भगत, शैलेश पाटील, गणेश मुंडे, आदेश भगत, अमर पाटील, दर्शना म्हात्रे, सुनिता मुंडे, दिपक जाधव, शशिकांत पाटील, निलेश पाटील, गुरुनाथ पाटील, विजय भोईर, धनंजय बेडेकर, सुप्रिया भगत, अर्चना भगत आदी माजी नगरसेवकांस संयोजन समितीते पदाधिकारी प्रचंड मेहनत घेत आहेत.तरी सर्वांनी या महोत्सवास भेट देवून समाजातील संस्कृतीच्या विविध पैलूंचे अवलोकन करावे.असे आवाहन संयोजक रमाकांत मढवी यांनी केले आहे.



# भाजपचे कृष्णा पाटील व नंदा पाटील यांच्या विकास निधीतून झालेल्या विविध विकासकामांचे लोकार्पण संपन्न




## आमदार केळकर व आमदार डावखरे यांची प्रमुख उपस्थिती



**ठाणे:- नगरसेवक कृष्णा पाटील व नंदा पाटील यांच्या माध्यमातून झालेल्या प्रभाग क्रमांक ११मधील विविध विकास कामांचे लोकार्पण भारतीय जनता पार्टीचे जेष्ठ आमदार संजय केळकर व जिल्हाध्यक्ष,आमदार निरंजन डावखरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.**



भारतरत्न, माजी प्रधानमंत्री अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीचे औचित्य साधून प्रभाग क्रमांक ११ मध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन नगरसेवक कृष्णा पाटील यांनी केले होते.

भारतरत्न स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टी प्रभाग क्रमांक ११चे नगरसेवक कृष्णा दादू पाटील आणि नगरसेविका नंदा कृष्णा पाटील यांच्या विकास निधीतून सार्वजनिक शौचालयांचा लोकार्पण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. आझाद नगर नंबर एक, मसान वाडा येथे नवीन शौचालय लोकार्पण करण्यात आले. त्याचबरोबर गोकुळ नगर, भवानी नगर येथे नवीन शौचालयाचे लोकार्पण करण्यात आले.प्रभाग क्रमांक ११ शाहूनगर, सिद्धिविनायक सोसायटी परिसरात नवीन शौचालयाचे लोकार्पण करण्यात आले.

अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त असंघटित कामगारांना संघटित करून शासकीय योजना मिळवून देण्याचे शिबिर यावेळी आयोजित करण्यात आले होते.

प्रभाग क्रमांक ११ मध्ये कृष्णा पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मन की बात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त मतदान ओळखपत्राला आधार कार्ड सोबत लिंक करण्याच्या शिबिराचे आयोजन देखील यावेळी करण्यात आले होते.या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून स्थानिक आमदार संजय केळकर, भारतीय जनता पार्टी ठाणे जिल्हा अध्यक्ष व पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे,प्रदेश सरचिटणीस माधवीताई नाईक, प्रदेश सचिव भाजपा संदीप लेले,नगरसेवक मुकेश मोकाशी, परिवहनचे सदस्य विकास पाटील, संघटन सरचिटणीस विलास साठे ,म्हात्रे, युवा मोर्चा अध्यक्ष सारंग मेढेकर, शहर सचिव सचिन पाटील, युवा प्रभाग अध्यक्ष अक्षय पाटील, सुरेश पवार, हितेश आणि प्रभागातील सर्व पदाधिकारी महिला आघाडी, युवा मोर्चा कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.











# स्वच्छ सर्वेक्षण २०२३ मध्ये ठाणे शहरास 'टॉप टेन'मध्ये आणण्यासाठी संपूर्ण ताकदीने काम करावे

## महापालिका आयुक्त अभिजीत बांगर



**ठाणे :** शहरातील स्वच्छता ही स्वच्छ सर्व्हेक्षण स्पर्धेपुरती मर्यादित न राहता आपले शहर नियमित स्वच्छ राहिल यासाठी प्रत्येकाने प्रयत्नशील असलेच पाहिजे. स्वच्छ सर्वेक्षण ही केवळ त्या विभागाचीच जबाबदारी समजली जाते परंतु शहर स्वच्छ ठेवणे हे महापालिकेतील प्रत्येक अधिकारी कर्मचारी यांचे कर्तव्य असून स्वच्छ शहर सर्वेक्षण २०२३ मध्ये ठाणे शहराला 'टॉप टेन' मध्ये आणण्यासाठी सर्वांनी संपूर्ण ताकदीने काम करावे असे निर्देश महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी गुरुवारी दिले.

स्वच्छ सर्वेक्षण २०२३ व शौचालय व्यवस्थापनाबाबत आढावा घेवून कामाचे नियोजन करण्यासंदर्भात गुरुवारी २१ डिसेंबरला महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात बैठक आयोजित केली होती. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, उपायुक्त, सहाय्यक आयुक्त, कार्यकारी अभियंता, स्वच्छता निरीक्षक, उपमुख्य स्वच्छता निरीक्षक उपस्थित होते.

शहरातील सार्वजनिक शौचालयांची विदारक स्थिती बदलणे गरजेचे असून यासाठी कामाचे नियोजन करण्याच्या सूचना बांगर यांनी दिल्या. सहाय्यक आयुक्त कार्यकारी अभियंता, यांनी आपापल्या प्रभागातील शौचालयाची पाहणी करुन धोकादायक, किरकोळ दुरूस्ती आवश्यक असणारी, मोठया प्रमाणावर आवश्यक असलेली दुरूस्तीची शौचालय असे शौचालयाचे वर्गीकरण करावे, शौचालयांमध्ये पाणी उपलब्ध असणे हे नागरिकांच्या सोईसाठी तसेच शौचालय स्वच्छ राहण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. शौचालयामध्ये छतावरच्या टाकीद्वारे पाणी उपलबध असणे हे शौचालय स्वच्छ राहण्यासाठी तसेच नागरिकांच्या सोईसाठी अत्यंत आवश्यक आहे. तरी ज्या शौचालयांवर पाण्याच्या टाक्या नाहीत, अशी शौचालये निश्चित करुन अशा शौचालयावर पाण्याच्या टाक्या बसवून नळाद्वारे पाणी उपलब्ध करुन देण्यात यावे. ज्या शौचालयांवर इमारतीची क्षमता नसल्यामुळे टाकी बसविणे शक्य नाही अशा शौचालयांवर जमिनीपासून लोखंडी अँगल उभारुन पाण्याच्या टाक्या बसवाव्यात, जर पाण्याचे कनेक्शन देणे शक्य नसेल तर बोअरवेल उपलब्ध करुन देण्यात यावी. सर्व शौचालयात दिव्यांग व्यक्तींना सहज प्रवेश करता येईल अशा पद्धतीने रॅम्प उपलब्ध करुन द्यावेत असे आयुक्त बांगर यांनी सांगितले.

# सिमेंट रस्त्यांमधील असलेले जॉईन्ट भरण्याच्या काम युद्धपातळीवर



**ठाणे :** पावसाळ्यानंतर आता ठाणे महापालिकेने रस्त्यावरील खड्डे बुजविण्याची मोहीम तीव्र केली असतानाच, आता सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यांमध्ये असलेले जॉईन्ट भरण्याचे कामही हाती घेण्यात आले आहे. या जॉईन्टचा अंदाज न आल्यास दुचाकी स्वारांचा अपघात होण्याची शक्यता दाट असते, त्यामुळे यावर उपाय म्हणून, महापालिकेच्या माध्यमातून हे काम हाती घेण्यात आले आहे. शहराच्या विविध भागात सध्या हे काम जोरदारपणे सुरू असल्याची माहिती महापालिकेच्या बांधकाम विभागाने दिली.

महापालिका हद्दीत ३७० किमीचे रस्ते आहेत. यातील अर्धे सिमेंट तर अर्धे डांबरीकरणाचे रस्ते आहेत. त्यातील आता ४५ किमी सिमेंट रस्त्याकडे पालिकेने आपला मोर्चा वळविला आहे. सिमेंट रस्त्यांमधील जॉईन्ट किंवा बाजूला असलेल्या चढ उताराच्या रस्त्यामुळे खासकरुन दुचाकी स्वारांना त्याचा अधिक त्रास होतांना दिसतो, काही वेळेस त्यावर जातांना दुचाकी स्वरांचे अपघातही होतांना दिसत होते. त्यामुळे अशा रस्त्यांची पाहणी मागील काही महिन्यापूर्वी महापालिकेच्या माध्यमातून करण्यात आली होती. त्यानंतर त्याची निविदा काढून आता १.०५ कोटींचा खर्च करुन सिमेंट रस्त्यावरील जॉईन्ट भरुन काढण्याचे काम युध्द पातळीवर करण्यास सुरवात झाली आहे.

शहरातील नौपाडा, राम मारुती रोड, कळवा, खारेगाव, मुंब्रा रेतीबंदर, आदींसह शहरातील इतर भागात असलेल्या ४५ किमी सिमेंट रस्त्यावर हे काम सुरु असल्याची माहिती महापालिकेच्या बांधकाम विभागाने दिली.




HAPPY NEW YEAR
सर्व दिवा शहरातील
नागरिकांना
नूतनवर्षाच्या २०२३
हार्दिक शुभेच्छा!
नवीन वर्ष सर्वांना
आनंदाचे व भरभराटीचे जावो
ही सदिच्छा!
शुभेच्छुक
कैलाश भगत
समाजसेवक, दिवा